# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संजयकुमार दळवी
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ: रासेयो/२५३/२०१४ दि. २५/११/२०१४

प्रति
मा.प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय: '१ डिसेंबर — जागतिक एड्स दिन' निमित्त उपक्रम राबविणेबाबत...

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय व पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थी व समाजामध्ये एड्स संदर्भात जनजागृती होण्याच्या दृष्टीने **'१डिसेंबर—एड्स जनजागृती दिन'** निमित्त सर्व रासेयो महाविद्यालयांमध्ये उपक्रम राबविण्यात यावेत. यामध्ये महाविद्यालयीन रेड रिबन क्लब तसेच विद्यार्थ्यामार्फत रॅली, निबंध, पोस्टर्स, भाषण, चित्रकला स्पर्धा, गटचर्चा इत्यादी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन आपल्या महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात यावेत.

जागतिक एड्स दिन २०१४ या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचे घोषवाक्य शून्य गाठायचा आहे ''Getting to Zero'' म्हणजेच..

**१. यापुढे नवीन एच.आय.व्ही. संसर्ग होवू द्यायचा नाही.**
**२. कलंक भेदभाव शून्यावर आणणे.**
**३. एड्सने होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण शून्यावर आणणे.**

**'१ डिसेंबर—जागतिक एड्स दिन'** निमित्त वरीलप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन आपल्या महाविद्यालयांमध्ये करण्यात यावे ही विनंती. तसेच राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा सविस्तर अहवाल व छायाचित्रे रासेयो कार्यालयास पाठवावीत.

कळावे,

आपला विश्वासू

**प्र.कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, पुणे महानगरपालिका
**PUNE CITY AIDS CONTROL SOCIETY, PMC.**
PCACS
PUNE MUNICIPAL CORPORATION
REGD. NO. MH/1248-2001/PUNE


PCACS / PMC / PUNE / 20 /

DATE :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे-७.
आवक/जावक क्र.: 219
दिनांक 24 NOV 2014
राष्ट्रीय सेवा योजना
शाखा-

आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.स्व.आ. ४०८०
दिनांक १८/११/२०१४

प्रति,
मा. प्रोग्राम कोऑर्डीनेटर,
राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ,
पुणे १६.

यांस.

विषय- जागतिक एड्स दिन निमित्त १ डिसेंबर २०१४ रोजी पुणे शहरातील सर्व महाविद्यालयातून एनएसएस स्वयंसेवकामार्फत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.

संदर्भ :- मा. अति. महापालिका आयुक्त (इस्टेटस), पुणे मनपा यांची जागतिक एड्स दिन २०१४ कार्यक्रमास व त्याकरिता येणा-या खर्चास मान्यता क्र. २/४२७६, दि. ७/११/२०१४.

महोदय / महोदया,

पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटी, पुणे महानगरपालिकेतर्फे १ डिसेंबर २०१४ रोजी जागतिक एड्स दिन पाळला जाणार आहे.

जागतिक एड्स दिन २०१४ या कार्यक्रमासाठी घोषवाक्य "शून्य गाठायचा आहे" "Getting to Zero" म्हणजेच- १. यापूढे नवीन एच.आय.व्ही. संसर्ग होउ दयायचा नाही, २. कलंक भेदभाव शून्यावर आणणे, ३. एड्सने होणा-या मृत्युंचे प्रमाण शून्यावर आणणे असा आहे.

पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटीस राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहरातील सर्व महाविद्यालयातून दि. १ डिसेंबर २०१४ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रेड रिबन क्लबद्वारा रॅली, निबंध स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गटचर्चा, इ. जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधीद्वारा करावयाचे आहे. या कार्यक्रमांसाठी आवश्यक आयईसी साहित्य आपल्या कार्यालयाकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात येईल.

तरी कृपया वरीलप्रमाणे पुणे शहरातील सर्व महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधीद्वारा दि. १ डिसेंबर २०१४ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एड्स जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत आपले कार्यालयाकडून सूचना देण्यात यावी.

मा. स. कळावे.

आपला विश्वासू,

डॉ. एस. टी. परदेशी
आरोग्य प्रमुख व सदस्य
पुशएनिसो, पुणे मनपा


OFFICE : DR. KOTNIS AROGYA KENDRA (GADIKHANA, P.M.C.), 663, SHUKRAWAR PETH, PUNE - 411 002.
**PH. : 24432785 • FAX : 020 - 24478966, 25506200 / 6205 (EXT. 6220) • E-MAIL : pcacspmc@gmail.com**
**web. : www.punecorporation.org • www.pmc.gov.in**